**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव — अमोल अशोक गायकवाड, वय — ३१ वर्षे,
व्यवसाय — निरंक, राहणार — इंदिरानगर, अकोले,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –</u>**

१. घटना दि. ०९.०७.२०१७ रोजी रात्री १२:०० वाजता अकोले येथील बाजारतळासमोर घडली होती. त्यादिवशी मी, शाम शेटे, शाहरूख शेख असे जेवन करून घरी जात असताना शाहरूख शेख याच्याकडे असणारी हिरो होंडा कंपनीची गाडी जिचा नोंदणी क्रमांक एम.एच १७ बी. आर ८०५ घेवून बाजूला बोलत उभे होतो. त्यावेळी राजूरकडून अकोलेच्या दिशेने एक सफेद रंगाची मारूती झेन गाडी रॉग साईडने भरधाव वेगाने आली व आम्हाला धडक दिली. धडक दिल्यानंतर मी बेशुध्द झालो. त्यानंतर मला शाहरूख शेख व शाम शेटे यांनी ग्रामीण रुग्णालय अकोले येथे ॲडमीट केले. त्यानंतर मला संगमनेर येथील तांबे हॉस्पीटल येथे हालविण्यात आले. त्यानंतर मला नगर येथील नोबेल हॉस्पीटल येथे ॲडमीट केले. नोबेल हॉस्पीटल येथे माझ्या छोटया मेंदूची सर्जरी झाली. त्यानंतर मी काही दिवसानंतर मी शुध्दीवर आलो. त्यावेळी माझा मोठा भाऊ राहूल अशोक गायकवाड याने सांगितले की, तुझा अपघात झाला आहे. तुझ्या छोट्या मेंदूची शस्त्रक्रिया झाली आहे. त्यानंतर मला गाडी चालक सचीन राजेंद्र कुदळ असे नाव कळाले. मारूती झेन गाडीचा नोंदणी क्रमांक एम.एच १२ सी. ए. ३४५९ असा होता. पोलीसांनी माझा जबाब दि. २२.०७.२०१७ रोजी नोंदवला होता. माझ्या भावाने सांगितल्यावरून मी

आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती. एस. बी. नवले यांच्या मार्फत**

२. मी बेशुध्द झाल्यानंतर मला एक ते दीड महिन्याने शुध्द आली. सदर अपघाताची माहिती मला माझा भाऊ राहूल गायकवाड याने दिली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाने मला जसे सांगितले होते तसेच मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी बेशुध्द झाल्यामुळे सदरचा अपघात कसा झाला हे मला कळाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिघेजण रात्री गाडीवर जात असताना पडल्यामुळे सदरचा अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा जबाब देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.08.02 16:55:28 +0530

दिनांक ०२.०८.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले